Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## प्रवेशप्रक्रिया २०२४ - २५ अभ्यासकेंद्र कार्यशाळा

### कार्यक्रमपत्रिका

वार: गुरूवार दि. ०८/०८/२०२४ वेळ: ११:३० ते ०४:००

स्थळ : हॉल नं. ३०९, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

| | |
|---|---|
| सत्र १ : वेळ: ११:३० ते १२:३० | |
| स्वागत व प्रास्ताविक | डॉ. के. बी. पाटील, समन्वयक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र |
| मनोगत | प्रा. डॉ. डी. के. मोरे, संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र |
| प्रमुख उपस्थिती | श्री. व्ही. बी. शिंदे, उपकुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र |
| आभार | डॉ. सी. ए. बंडगर, (हंगामी समन्वयक) |
| सुत्रसंचालन | डॉ. एन. एस. रणदिवे, (हंगामी सहाय्यक प्राध्यापक) |
| सत्र २ : वेळ: १२:३० ते ०२:०० | |
| १. ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, ABC ID, UGC DEB-ID तयार करणे, दुहेरी पदवी अर्ज भरणे याबाबत प्रात्यक्षिक | श्री. एस. डी. हुक्केरी, सिस्टीम प्रोग्रमर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर<br>श्री. अमोल आडगुळे, आय टी प्रतिनिधी<br>श्रीमती. एन. एन. मुलाणी (हंगामी समन्वयक आयटी)<br>श्री. व्ही. एम. मोहिते, (संगणक चालक)<br>डॉ. एम. एम. मुजावर, (हंगामी सहाय्यक प्राध्यापक) |
| २. अभ्यासकेंद्राच्या कामकाजाबाबत मार्गदर्शन | डॉ. के. बी. पाटील, समन्वयक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र |
| वेळ: ०२:०० ते ०३:०० | |
| मध्यान्ह भोजन | कॅन्टिन, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र |
| सत्र ३ : वेळ: ०३:०० ते ०४:०० | |
| संबंधित अभ्यासकेंद्र मेंटॉर आणि समन्वयक गटचर्चा | समुपदेशन कक्ष, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र |

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## आयोजित

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील समन्वयक व लेखनिकांसाठी प्रवेशप्रक्रिया कार्यशाळा

## अहवाल

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयांतील ८६ महाविद्यालयाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण अभ्यासकेंद्रातील समन्वयक व लेखनिकांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ साठीची प्रवेशप्रक्रिया माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन गुरूवार दि. ०८ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ११.०० वा. मुख्य कार्यालयातील खोली नं. ३०९ मध्ये केलेले होते. यावेळी उपकुलसचिव श्री. व्ही. बी. शिंदे, समन्वयक डॉ. के. बी. पाटील, सहाय्यक कुलसचिव श्री. दिलीप मोहाडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच आय टी. विभागातील श्री. मिलिंद सुरूलकर, श्री. सनद अडमुठे, श्री. राजु अंदरगिसिके, श्री. अमोल आडगुळे हे उपस्थित होते.

उपकुलसचिव श्री. व्ही. बी. शिंदे मार्गदर्शन करताना म्हणाले की, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण हे शिक्षणापासून वंचित असणा–या घटकांना शिकणा–या प्रवाहात आणण्याचे कार्य करीत आहे तसेच या केंद्राने ऑनलाईन एम.बी.ए हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. त्याचा ही फायदा विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे. शैक्षणिक क्षेत्रात होणा–या नव्या बदलासाठी व आपण सज्ज असले पाहिजे. शैक्षणिक धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी असे प्रतिपादन केले.

यावेळी श्री. विकास मोहिते यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज करणेबाबत माहिती देवून समन्वयक व लेखनिक यांना येणा–या तांत्रिक अडचणीबाबत मार्गदर्शन केले. तसेच सहाय्यक प्राध्यापक डॉ. मुफिद मुजावर यांनी DEB व ABC ID तयार करणे व दुहेरी पदवी अर्ज भरणेबाबत प्रात्यक्षिक सादर केले. तसेच अभ्यासकेंद्राच्या कामकाजाबाबत समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी विविध अभ्यासकेंद्रातील समन्वयक व लेखनिक यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राने नव्याने करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचित केले. त्या सुचना पुढीलप्रमाणे:

१. नियमित व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांची Exam यादी वेगवेगळी देण्यात यावी.

२. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातून उत्तीर्ण होणा—या विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी तयार करून जाहीर करावी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात यावा.

३. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत बी.ए./बी. कॉम. भाग १ साठी असणा—या CC च्या विषयांसंदर्भात रेकॉर्ड कसे ठेवावे याबाबत परिपत्रक प्रसिध्द करावे.

४. अभ्यासकेंद्रांना प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची पात्रता यादी कॉलेज लॉगीन मध्ये देण्यात यावी.

५. RBA प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड ऑनलाईन पोर्टलला दिसले पाहिजे किंवा PRN, Seat No., Hall Ticket व Study Centre अभ्यासकेंद्रांना कळवावे.

६. अभ्यासकेंद्रासाठी बी.ए./बी. कॉम. साठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत ऑनलाईन मार्गदर्शन घेण्यात यावे.

७. ज्या विद्यार्थ्यांनी फी भरलेली आहे अशांची यादी अभ्यासकेंद्राच्या लॉगीनला दिसल्यास अभ्यासकेंद्रांना फॉर्म ॲप्रोव्ह करायला अडचणीचे होणार नाही.

यावेळी प्रास्ताविक व स्वागत समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक डॉ. एन. एस. रणदिवे यांनी केले व आभार डॉ. सी. ए. बंडगर यांनी मांडले.

श्रीमती. व्ही. जी. कापडे
कनिष्ठ लेखनिक/ऑफिस असिस्टंट

डॉ. एन. एस. रणदिवे
सहाय्यक प्राध्यापक

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416 004,
MAHARASHTRA
CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION
PHONE : – 2609105, 2609451, 2609452
www.unishivaji.ac.in, e-mail-cde@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४, महाराष्ट्र
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९१०५, २६०९४५१, २६०९४५२
ww.unishivaji.ac.in, e-mail-cde@unishivaji.ac.in

जा.क्र. शिवाजी वि/सीडीओई/ 408 दिनांक : 03 AUG 2024

प्रति,
मा.प्राचार्य (केंद्रप्रमुख),
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण सर्व अभ्यासकेंद्रे,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय: शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ विद्यार्थी प्रवेशप्रक्रिया कार्यशाळेबाबत.

महोदय/महोदया,

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया जून, २०२४ पासून मुख्यालय व कोल्हापूर, सांगली, व सातारा जिल्हयातील विविध अभ्यासकेंद्रामार्फत सुरू झालेली आहे. सदर प्रवेशप्रक्रिये संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्याच्यादृष्टीने चालू शैक्षणिक वर्षामध्ये आपल्या अभ्यासकेंद्रावर कार्यरत असणारे समन्वयक व संबंधित लेखनिक यांची **कार्यशाळा गुरूवार दि.०८ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यशाळेस विद्यापीठाचे दूरशिक्षण केंद्राचे वरिष्ठ अधिकारी त्याचबरोबर विद्यापीठातील आय.टी. विभागाचे व संगणक केंद्राचे अधिकारी खालील बाबींवर मार्गदर्शन करणार आहेत.

1. Online Admission cum examination form process.
2. Electronically Inwarding of application cum examination form.
3. How to Generate ABC ID Number.
4. How to Generate UGC-DEB-ID Number.
5. Duel Degree Online Application.
6. Generation of various reports & submission.
7. Any other item.

तसेच प्रवेशप्रक्रीया सुलभ होण्याच्या दृष्टीने आपल्या सुचना, अडचणी तात्काळ cde@unishivaji.ac.in या ई-मेल वर पाठवून द्याव्यात जेणेकरून कार्यशाळेमध्ये आपणास मार्गदर्शन करता येईल. सदर कार्यशाळेसाठी आपल्या अभ्यासकेंद्राचे समन्वयक व लेखनिक यांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

Bhonde

उपकुलसचिव

प्रत - १. सर्वसाधारण बांधकाम व देयके विभाग
२. परीक्षा विभाग
३. संगणक केंद्र
४. दूरशिक्षण प्रवेश विभाग

<u>महत्वाची टिप</u> : उपस्थित सदस्यांनी आपल्या बॅंकेचे नांव, खाते नंबर व IFSC Code इ. बाबी प्रवास भत्ते देयकामध्ये बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे.